**समक्ष अध्यक्ष, मोटार अपघात प्रकरणे न्यायाधिकरण, वर्धा**
**एम.ए.सी.पी (एम.ए.एन.आर.जे.आय.) क्र. ७१/२०२६**
**सीमा लुकेश लोटे व ३ –वि.– निरंक**
**आदेश नि. क्र. १ वर पारित**
**दिनांक ०५/०८/२०२६**

मोटार अपघात दावा प्रकरण क्र. २०/२०२३ दिनांक १८/०३/२०२६ रोजी निकाली काढण्यात आले. सदर प्रकरणातील आदेशानुसार गैरअर्जदार युनायटेड ईंडिया इंश्युरन्स कंपनी यांनी रक्कम रुपये १,४२,२८४/- (अक्षरी रूपये एक लाख बेचाळीस हजार दोनशे चौ-याऐंशी फक्त) न्यायालयात जमा केली आहे. ती रक्कम मिळण्याकरीता मुळ प्रकरणातील अर्जदार क्र. १ सीमा लुकेश लोटे, अर्जदार क्र. २ सुरेखा साहेबराव उके, अर्जदार क्र. ३ सुनिता गौतम डुकरे व अर्जदार क्र. ४ मनोज रामाजी शंभरकर यांनी त्यांचे हिश्याची रक्कम मिळण्याकरीता सदर अर्ज केलेला आहे.

उपरोक्त मोटार अपघात प्रकरण २०/२०२३ मधे अर्जदाराने अर्जात नमुद केलेली रक्कम रुपये १,४२,२८४/- (अक्षरी रूपये एक लाख बेचाळीस हजार दोनशे चौ-याऐंशी फक्त) ही U.T.R. No. UTIB0000006AXISCN1361354320 दिनांक ०२.०६.२०२६ नुसार जमा असुन सदर रक्कम R-11/2026 दिनांक १५/०६/२०२६ नुसार जमा असल्याबाबतचा अहवाल नि. क्र. ५ अन्वये वरिष्ठ लिपीक (मोटार अपघात), रोख व वित्त विभाग, जिल्हा न्यायालय, वर्धा यांनी दिलेला आहे.

प्रकरणांतील निकालाचे आदेशाविरुध्द मा. उच्च न्यायालयात अपील झालेले नाही अथवा स्थगनादेश नाही असा अहवाल संबंधित लिपीक यांनी दिलेला आहे. मुळ अभिलेखाची पडताळणी केली असता अर्जदाराने प्रकरणांत आवश्यक असलेली कोर्ट फी भरली आहे. करीता मुळ प्रकरणातील आदेशानुसार अर्जदार क्र. १ ते ४ यांना रक्कम देणे योग्य होईल.

करिता खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

<u>**आदेश**</u>

१. मुळ प्रकरणातील अर्जदार क्र. १ सीमा लुकेश लोटे, अर्जदार क्र. २ सुरेखा साहेबराव उके, अर्जदार क्र. ३ सुनिता गौतम डुकरे व अर्जदार क्र. ४ मनोज रामाजी शंभरकर यांना U.T.R. No. UTIB0000006AXISCN1361354320 मधे जमा असलेली रक्कम रूपये १,४२,२८४/- (अक्षरी रूपये एक लाख बेचाळीस हजार दोनशे चौ-याऐंशी फक्त) पैकी त्यांचे हिश्याची रक्कम रुपये ३५,५७१/- (अक्षरी रूपये पस्तीस हजार पाचशे एकाहत्तर फक्त) प्रत्येकी एवढी त्यांचे खात्यात पडताळणीअंती प्रदान करण्यांत यावी. याप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येतो.

HEMANT BHAGWANTRAO GAIKWAD
Digitally signed by HEMANT BHAGWANTRAO GAIKWAD
Date: 2026.08.05 17:28:31 +0530

(हिमंत भ. गायकवाड)
अध्यक्ष,
मोटार अपघात प्रकरण न्यायाधिकरण,वर्धा

दिनांक: ०५/०८/२०२६